# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १९.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १८/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४६,१००/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. १८/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २,७२०/-रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १८/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०८ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. १८/०१/२०२३ रोजी पोस्टे सेनगाव येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.